**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या दारी उपक्रम १ ऑक्टोबर रोजी**

अमरावती -

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @ अमरावती हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक, अधिकाऱ्यांसमवेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडीअडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने सर्व संबंधित घटकांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावर उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय @अमरावती ही विशेष लिंक निर्माण केली आहे. येथे नागरिकांना इंग्रजी अथवा मराठीतून आपले प्रश्न मांडता येणार आहेत. निवेदनाची सॉफ्ट कॉपी अपलोड करण्याची व्यवस्थाही येथे आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना आपली निवेदने दि. २६ सप्टेंबर, २०२१ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. ज्यांना ऑनलाईन निवेदन सादर करणे शक्य होणार नाही, त्यांनाही प्रत्यक्ष उपस्थित राहून मा. मंत्री महोदयांना आपले निवेदन सादर करता येईल. सदर उपक्रम दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठ परिसरातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित केला आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय आपल्या दारी या उपक्रमाला सर्व हिततुल्य घटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा आणि आपले प्रश्न, अडचणी व उच्च शिक्षणाच्या विकासाविषयक सूचना मांडाव्यात, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २१/०९/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी